देशोन्नती

# बोरकन्हार येथे 'ग्रामालोक' कार्यक्रमाचे आयोजन १३ जुलै रोजी

**सालेकसा :** साहित्य अकादेमी, क्षेत्रीय कार्यालय मुंबई आणि आर. डी. एस. हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, बोरकन्हार यांच्या संयुक्त विद्यमाने ग्रामीण साहित्याला प्रोत्साहन देण्यासाठी 'ग्रामालोक' या प्रतिष्ठित कार्यक्रमाचे आयोजन रविवार, १३ जुलै रोजी सकाळी ११ वाजता बोरकन्हार येथे करण्यात येत आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रा. अरविंद कटरे हे राहतील. साहित्य अकादेमी मराठी परिषर मंडळाचे सदस्य व ज्येष्ठ साहित्यिक लखनसिंह कटरे यांच्याकडून स्वागत वक्तव्य करण्यात येईल. कार्यक्रमात मराठी कविता वाचन सत्राचे आयोजन करण्यात आले असून देवेंद्र चौधरी, युवराज गंगाराम, मिलिंद रंगारी, गोवर्धन बिसेन, पवन पाथोडे हे कवी आपल्या सृजनशील कविता सादर करणार आहेत. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन उमेश कुमार कटरे मुख्याध्यापक आर. डी. एस. हायस्कूल व ज्युनियर कॉलेज, बोरकन्हार हे करणार आहेत. ग्रामीण भागातील साहित्याची चळवळ बळकट करण्यास मदत करणारा आणि नवोदित कवी-लेखकांना व्यासपीठ उपलब्ध करून देणारा हा कार्यक्रम गावातील विद्यार्थ्यांसह साहित्यप्रेमींना एक प्रेरणादायी संधी ठरणार आहे.

Gondia Edition
Jul 09, 2025 Page No. 6
Powered by: erelego.com